21-22

SHIVAJI COLLEGE HINGOLI

ISSN 2454-3292

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# INDO WESTERN RESEARCH JOURNAL

(UGC Approved Refereed, Peer Reviewed & Indexing Research Journal)

Year-VIII,Issue - XVI,Vol.-I | Impact Factor 6.00 (GRIFI) | Mar. 2022 To Aug. 2022

EDITOR IN CHIEF

**DR. NILAM CHHANGANI**

INDO ASIAN PUBLICATION

T. C

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

025

Scanned with OKEN Scanner

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

IMPACT FACTOR 5.50

ISSN 2454-3292

International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for All Subjects

IAP
INDO ASIAN PUBLICATION

# INDO WESTERN RESEARCH JOURNAL

## UGC APPROVED, REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue : XVI, Vol. I

Year- VIII, BI-Annual (Half Yearly)

(Mar. 2022 To Aug. 2022)

**Editorial Office :**

'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Website**

**www.jpiap.com**

**Contact : - 02382 - 241913**
09423346913 / 09637935252
09503814000 / 07276301000

**E-mail :**
visiongroup1994@gmail.com
interlinkresearch@rediffmail.com
iasrolatur2015@gmail.com

**Published by :**
**Indo Asian Publication,**
Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

**Price : ₹ 200/-**

**EDITOR IN CHIEF**

**Dr. Nilam Chhangani**
Head, Dept. of Economics, S. K. N. G. Mahavidyalaya,
Karanja Lad, Dist. Washim (M.S.) India

**EXECUTIVE EDITORS**

**Dr. Subhash Deshmukh**
Head, Dept. of Economics,
Dada Patil Rajale Mahavidyalaya,
Adhinathnagar, Dist. Ahmednagar(M.S.)

**Dr. Balaji G. Kamble**
Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar College,
Latur, Dist. Latur (M.S.)

**DEPUTY EDITOR**

**Dr. P. T. Pawar**
Dept. of Commerce,
Shivaji College,
Renapur, Dist. Latur (M.S.)

**Dr. Lalita Chandratre**
Dean, Sanskrit and Education,
K. K. Sanskrit University,
Ramtek, Dist. Nagpur (M.S.)

**CO - EDITOR**

**Vanita Jadhav**
Mother Terasa B.Ed. College,
Dharwad, Dist. Dharwad
(Karnataka)

**Dr. Vinayak R. Waghmare**
Head, Dept. of Commerce,
Shri Kumarswami Mahavidyalaya,
Ausa, Dist. Latur (M.S.)

**MEMBER OF EDITORIAL BOARD**

**Dr. Mohmmad T. Rahaman**
Dept. of Biomedical Science,
International Islamic University,
Mahkota (Malasiya)

**Dr. Sivappa Rasapali**
Dept. of Chemistry & Biochemistry,
UMASS. Wesport Road,
Dartmouth, MA (U.S.A.)

**Dr.Bhaskar S. Wazire**
Head, Dept. of History,
Sitabai Arts College,
Akola, Dist. Akola (M.S.)

**Dr.Sarjerao R. Shinde**
Principal
B. K. D. College,
Chakur, Dist. Latur ( M.S. )

**Dr.Satyenkumar P. Sitapara**
Principal
Commerce & BBA College,
Amreli, Dist. Amreli (Gujrat)

**Dr. Ambuja Malkhedkar**
Gulbarga, Dist. Gulbarba
(Karnataka)

**Dr. M. S. Kamble**
Dept. of History,
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed (M.S.)

**Dr. Prashant Kshirsagar**
Dept. of Marathi
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed (M.S.)

T.C.
Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)

Scanned with OKEN Scanner

SHIVAJI COLLEGE HINGOLI

ISSN 2454-3292

International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for All Subjects

IAP
INDO ASIAN PUBLICATION

# INDO WESTERN RESEARCH JOURNAL



## PEER REVIEW COMMITTEE

Dr. Nilam Chhangani,Washim (M. S.)
Dr.Balaji G. Kamble, Latur (M.S.)
Dr. M. D. Rahaman, Mahkota (Malasiya)
Dr.Ramchandra J. Joshi, Nagpur (M.S.)
Dr.Satyenkumar Sitapara, Amreli (GJ)
Dr.Vinayak R. Waghmare, Latur (M.S.)
Dr. Lalita Chandratre, Nagpur (M.S.)
Dr. Nita Bhosale, Gulbarga (Karnataka)
Dr. P. T. Pawar, Latur (M.S.)
Dr. Balaji D. Ingale, Nanded (M.S.)
Dr. Suma S. Nirni, Bijapur (K.A.)
Dr.Subash Deshmukh, Ahmadnagar (M.S.)
Dr. Sakharam V. Kakade, Beed (M.S.)
Dr. M. S. Kamble, Beed (M.S.)
Vanita Jadhav, Dharwad (K. A.)
Dr. Vinod Veer, Satara (M.S.)

## ADVISORY BOARD

Dr. Nilam Chhangani,Washim (M. S.)
Dr.Balaji G. Kamble, Latur (M.S.)
Dr. M. D. Rahaman, Mahkota (Malasiya)
Dr.Ramchandra J. Joshi, Nagpur (M.S.)
Dr.Satyenkumar Sitapara, Amreli (GJ)
Dr.Vinayak R. Waghmare, Latur (M.S.)
Dr. Lalita Chandratre, Nagpur (M.S.)
Dr. Nita Bhosale, Gulbarga (Karnataka)
Dr. P. T. Pawar, Latur (M.S.)
Dr. Balaji D. Ingale, Nanded (M.S.)
Dr. Suma S. Nirni, Bijapur (K.A.)
Dr.Subash Deshmukh, Ahmadnagar (M.S.)
Dr. Sakharam V. Kakade, Beed (M.S.)
Dr. M. S. Kamble, Beed (M.S.)
Vanita Jadhav, Dharwad (K. A.)
Dr. Vinod Veer, Satara (M.S.)


T.C.

Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)

Scanned with OKEN Scanner

IAP
Issue : XVI, Vol. I
IWRJ
IMPACT FACTOR 5.50
ISSN 2454-3292
Mar. 2022 To Aug. 2022

SHIVAJI COLLEGE HINGOLI

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 1 | Acid Rain, Causes, Effects And Control Strategies<br>**Priti Kothari** | 1 |
| 2 | The Need For Developing Women Entrepreureship<br>**Dr. Baljeet Kaur R. Oberoi** | 6 |
| 3 | Performance Evaluation of Goat Farming Schemes by ITDP for Tribal People: A Case Study Dahanu Taluka<br>**Dr. Anil R. Chougule** | 14 |
| 4 | Multiculturalism in Kiran Desai's The Inheritance of Loss<br>**Sushilkumar Raut** | 24 |
| 5 | The Study Of Spatial Distribution And Growth Of Rural Settlements In Tribal Area Of Nashik District, Maharashtra<br>**Dr. Vikas Ankushrao Deshmukh** | 30 |
| 6 | नाटककार नरेंद्र मोहन और उनके नाटक<br>**डॉ. अल्लाबक्ष जमादार** | 37 |
| 7 | महाराष्ट्रातील पाणीधोरण - एक चिकित्सा<br>**डॉ. गजेंद्र एस. वासनिक** | 43 |
| 8 | सहकार चळवळ आणि महाराष्ट्राचा ग्रामीण विकास<br>**डॉ. डी. बी. रघूवंशी** | 48 |
| 9 | कृषी विकासावर हवामान बदलाचा परिणाम<br>**डॉ. मधुकर ताकतोडे** | 52 |
| 10 | खानापूर तालुक्यातील लोककलांचे स्वरुप<br>**डॉ. यशवंत राऊत, सुनिता गं. राक्षे** | 59 |
| 11 | जैनांचा ज्ञानसिध्दांत<br>**डॉ. एस. आर. भुसारे** | 64 |



T.C

Lecturer
Shivaji College, Hingoli
Tq.& Dist. Hingoli (MS.)

Scanned with OKEN Scanner

**Indo Western Research Journal (IWRJ)** (64)

IMPACT FACTOR 5.50

www.irasg.com

ISSN 2454-3292
Indo Western Research Journal (IWRJ)
Issue : XVI, Vol. : I
Mar. 2022 To Aug. 2022

Research Paper 11 Philosophy

# जैनांचा ज्ञानसिध्दांत

SHIVAJI COLLEGE HINGOLI

डॉ. एस. आर. भुसारे
तत्वज्ञान विभाग,
शिवाजी महाविद्यालय,
हिंगोली, जि. हिंगोली

गोषवारा

*प्रस्तुत विषयाच्या संदर्भात विचार मांडत असताना जैनांच्या तत्त्वज्ञानाची पार्श्वभूमी पाहणे आगत्यचे ठरते. जैन दर्शन ही भारतीय तत्त्वज्ञानातील श्रमण परंपरा म्हणून ओळखली जाते. छश्रमणङ शब्दाचा अर्थ मराठी विश्वकोशात असा केला जातो की, सर्वसंगपरित्याग केलेल्या जैन आणि बौध्द मुनींना वा भिक्षूंना श्रमण म्हणतात जो श्रमतो तो श्रमण किंवा सम मन ज्याचे आहे तो समण (श्रमण) होय. भारतीय तत्त्वज्ञानात जैन दर्शन या नास्तिक दर्शनाचे अनन्य साधारण महत्व आहे. इतर दर्शना प्रमाणे जैनांनीही आपला ज्ञानसिध्दांत मांडला आहे. प्रामुख्याने जैनांच्या ज्ञानसिध्दांता बद्दल प्रस्तुत शोध निबंधामध्ये साधक बाधक चर्चा करण्यात येईल. ज्ञानाच्या संबंधी जैनांनी आपल्या ज्ञानसिध्दांताच्या आधारे सत्तशास्त्रीय सिध्दांताची चर्चा केलेली आहे. त्यासंबंधी सवस्तिर विश्लेषण प्रस्तुत शोध निबंधात करण्यात येणार आहे.*

**संज्ञा :-** कुठल्याही तात्विक संज्ञेची चर्चा करत असताना त्या संज्ञे संबंधी मूलभूत माहिती सर्वात अगोदर करून घेणे आवश्यक असते. प्रस्तुत शोध निबंधक हा ज्ञानसिध्दांता संबंधी विश्लेषण करणारा आहे त्यामुळे या ठिकाणी ज्ञान म्हणजे काय? जैनांचा ज्ञान सिध्दांत काय आहे या संबंधी विश्लेषण करण्यात येणार आहे त्या संज्ञचा अर्थ या ठिकाणी अपेक्षित असतो. तो व्यक्त करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

**प्रस्तावना :-**

प्रस्तुत शोध निबंधाचा विषय हा जैन दर्शनकारांचा ज्ञान सिध्दांत आहे सर्वच भारतीय दर्शनकारांनी ज्ञान सिध्दांताच्या संदर्भात सखोल आणि सविस्तर अशी चर्चा केली आहे. विशेषत्वाने न्याय दर्शनात ज्ञानशास्त्रा संबंधी सविस्तर चर्चा केलेली असल्यामुळे न्याय दर्शनाला भारतीय तर्कशास्त्र म्हणून ओळखले जाते. प्रस्तुत शोध निषंधात जैन दर्शनकारांनी ज्ञानशास्त्रा संबंधी केलेली चर्चा सविस्तरपणे मांडण्यात येणार आहे. ज्ञान म्हणजे काय? ज्ञान कसे उत्पन्न होते? ज्ञानाची यथार्थता कशात असतो. ज्ञानाची सत्यासत्यता कशात आणि कशी शोधावी या सर्वच प्रश्नांची उत्तरे आपल्याला भारतीय तत्त्वज्ञानात सापडते. त्या संबंधी संशोधन या शोध निबंधात करण्यात येणार आहे. विशेषत्वाने जैन दर्शनकार त्यांच्या ज्ञान सिध्दांतात सद्वस्तू मिमांसेच्या माध्यमातून ज्ञान सिध्दांत मांडण्याचा प्रयत्न करतात. त्याचा उहापोह प्रस्तुत शोध निबंधात करण्यात येणार आहे.



T.C
Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)

Scanned with OKEN Scanner

SHIVAJI COLLEGE HINGOLI

उद्देश :-

भारतीय दर्शनांमध्ये सर्वच दर्शनांनी ज्ञान सिध्दांता संबंधी चर्चा केली आहे जैन दर्शनकारांचे या सर्वांमध्ये वेगळेपण हे आहे की त्यांनी आपला ज्ञान सिध्दांत सदवस्तू मिमांसेच्या माध्यमातून विश्लेषित केला आहे. जैनांचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोनातून हा अनेकांतवाद आहे ते नेहमी या विश्वाच्या संदर्भात अनेकांतवादी दृष्टिकोनातून विचार करता आणि वेगळेपण वाचकांच्या समोर मांडण्याच्या दृष्टिकोनातून हा विषय निवडण्यात आला आहे.

विषय विश्लेषण :-

भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास करत असताना आस्तिक सहा आणि नास्तिक तीन दर्शनांचा विचार करावा लागतो. भारतीय विचारधारा ही विविधांगी स्वरूपांची आहे. थोडक्यात सांगायचे झाले तर आस्तिक म्हणजे वेदाचे प्रामाण्य मान्य करणारे अणि नास्तिक म्हणजे वेदामध्ये सांगितलेले ज्ञान अमान्य करणारे. भारतीय तत्त्वज्ञानात प्रामुख्याने हे दोन ढोबळ विचार प्रवाह आपल्याला पहायला मिळतात हे दोनही विचार प्रवाह जरी एकमेकांच्या सोबत आणि समांतर कालावधीत पुढे जात असले त्यांचा वैचारिक विकास झाला असला तर त्यांच्या विचारांच्या बैठकी वेगवेगळ्या होत्या एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करत करत त्यांचे विचार परिदृढ परिपक्व झाले असल्याचे आपणास पहावयास मिळते.

जैन दर्शन हे श्रमण परंपरेती असल्यामुळे या ठिकाणी अनुभवजन्य ज्ञानाला जास्त महत्व दिले जात असल्याचे आपणास पहावयास मिळते. आणि म्हणून जैनांचा दृष्टिकोन हा अनेकांतवाद आहे असे मीवर म्हटले आहे. अनेकांतवाद वाद हा जैनांचा ज्ञान-सिध्दांत आहे. एखादया वस्तुला आपण वेगवेगळ्या अनेक दृष्टिकोनातून बघू शकतो. उदाहरणार्थ आपण व्यवहारातील उदाहरण घेतले तर ते आपल्या सहज लक्षात येवू शकते. समजा एखादया गोष्टीचा कोणी फक्त सकारात्मक दृष्टिकोनातून विचार करत असेल तर त्याच गोष्टीचा नकारात्मक दृष्टिकोनातून ही आणि तसेच बऱ्याच वेगवेगळ्या दृष्टिकोनातून विचार करता येतो. म्हणून जैनांच्या मते वस्तूही अनेक धर्मात्मक असते. या संदर्भात डॉ. वेदप्रकाश डोणगावकर म्हणतात च्अनेकत्त्ववाद हा जैन तत्त्वज्ञानातला एक महत्त्वाचा सिध्दांत आहे. प्रामुख्याने तत्त्वाच्या ज्ञानासंदर्भात आलेले विविध दृष्टिकोन आणि त्यासंदर्भात जैनांची असलेली भूमिका या ठिकाणी दिसून येते. जैन दर्शनकारांच्यामते सद्वस्तू किंवा Reality ही एक नसून विविध प्रकाराची आहे. ज्ञान ज्ञाता आणि ज्ञेय वस्तू हे भिन्न आहेत. ज्ञये पदार्थ स्वतंत्रपणे अस्तित्वात असू शकते असा वास्तववादी दृष्टिकोन जैनांनी स्वीकारला आहे. जैनांनी प्रत्येक बदल हा घडत असतो. त्यामध्ये निर्मिती आणि नाश या प्रक्रिया सतत चालत असतात. तरी देखील त्यामध्ये नित्य असा काही तरी प्रकार असतो. ज्यांच्या आधारे परिवर्तन होत असतात. हे दाखवण्यासाठी त्याने सद्वस्तू किंवा द्रव्य याची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आहे. उत्पाद, व्यय घ्रोव्य युक्त सत् या व्याख्येनुसार सत् द्रव्य म्हणून ज्री सद्वस्तू ओळखतो ती सद्वस्तू, उत्पन्न होते. तिचा नाश ही होतो हे सर्व ज्याच्या आशयाने घडते तो अंश देखील नित्य असतो नित्य असणे हे द्रव्याचे लक्षण आहे. अशी ही एक व्याख्या उमास्वाती नावाच्या जैन दर्शनकारांनी केलेली आहे. सत् द्रव्य लक्षणम् त्याच बरोबर गुण, पर्याय यांनी युक्त असते.

जैनांचा ज्ञानसिंध्दात / अनेकांतवाद :-

इतर दर्शनप्रमाणे जैन दर्शनातही सर्वप्रथम ज्ञान चर्चा केली आहे. ज्ञान चर्चेच्या आधाराने इतर सर्व सिध्दांत सांगितले आहेत. त्यांची ज्ञान चर्चा म्हणजे अनेकांतवाद होय. जैन एक धर्म म्हणून अहिंसा हे तत्त्व मुलाधार आहे. आणि जैन एक दर्शन म्हणून अनेकांतवाद हा त्यांचा मुलाधार आहे. जैनांनी अनेकांतवादी भूमिका ही अहिंसे मधूनच निर्माण झाली आहे. बौध्दिक पातळीवरील अहिंसा किंवा भिन्नमत सहिष्णूता म्हणजेच अनेकांतवाद होय.

अंत म्हणजे बाजू, निश्चय, निर्णय, शेवट, कड होय. एकांत म्हणजे एक बाजू, निश्चय किंवा निर्णय होय.



T.C
Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)



Scanned with OKEN Scanner

जैनांच्या मते, वस्तु अनंतधर्मात्मक आहे. कुठल्या गोष्टीला अनेक बाजू असतात कोणत्याही गोष्टीसंबंधी एकांतिक मत न बनवणे म्हणजे अनेकांतवादी दृष्टिकोन स्वीकारणे होय. वस्तूच्या स्वरूपा विषयी आपला दृष्टिकोन एकांगी राहणार नाही याची काळजी घेणे म्हणजे अनेकांतवाद होय कोणत्याही गोष्टीसंबंधी आपले मत एकांगी असणार नाही याची जाणीव होणे म्हणजे अनेकांतवाद स्वीकारणे होय. आपण वस्तूच्या कोणत्यातरी बाजू विषयी एकच दृष्टिकोन स्वीकारणे असतो आपल्या दृष्टिकोनात सर्व बाजूंचा समावेश झालेलाच असतो असे नव्हे. आपल्या दृष्टिकोनाला मर्यादा असते वस्तूच्या अनंत धर्मा विषयीचे ज्ञान फक्त मुक्त पुरूष किंवा केवली यांनाच होते. असे धार्मिक मत जैन मांडतात.

जैनांचा अनेकांतवाद हा जगाकडे पाहण्याचा एक विशिष्ट दृष्टिकोन आहे. अनेकांतवादी दृष्टिकोन जेव्हा ज्ञानाच्या अपेक्षेने वापरला जातो तेंव्हा नयवाची निर्मिती होते आणि विधान किंवा तार्किकतेच्या अपेक्षेणे अनेकांतवाद वापरला जातो तेंव्हा, स्यादवादाची निर्मिती होते. नव्यवाद आणि स्याद्वाद हे अनेकांतवादाचीच रूपे आहेत. नयवाद आणि स्याद्वाद मिळून जैनांचा अनेकांतवाद पूर्ण होतो.

जैन दर्शनकारांच्या तत्त्वज्ञानाचा विचार करताना त्यांनी आपला ज्ञान सिध्दांत हा अतिशय सखोल अशा पध्दतीने मांडला आहे. त्यांच्या अनेकांतवादी दृष्टिकोनाचे पुढे दोन भाग केले गेले ज्ञानाच्या दृष्टिकोनातून वस्तुकडे बघणे याला त्यांनी नयवाद म्हटले आहे तर विधानाच्या किंवा तर्काच्या दृष्टिकोनातून पाहिले असता स्यायदवादाची निर्मिती होते. नयवाद म्हणजे वस्तूचा अंश, अंग, बाजू किंवा पाहणाऱ्याचा दृष्टिकोन किंवा अभिप्राय होय असे ते म्हणतात. पुढे त्यांनी नयाचे दोन भाग केले आहेत. १) द्रव्यनय आणि पर्याय नय होय. द्रव्यनय म्हणजे त्या वस्तूच्या ठिकाणी असणारा मूलभूत गुणधर्म होय. समजा कापड ही वस्तू घेटली तर सुत, पेळू हे त्याचे प्रकार अलेले तरी त्याच सर्वांचा मूलभूत एक पदार्थ आहे आणि तो म्हणजे कापूस हा होय घ्पणाङ Ness ज्याला म्हणतो तो या वरील सर्व पदार्थामध्ये आपल्याला दिसून येतो तो द्रव्याचा प्रकार होय.

पर्यायनय हा वस्तूकडे पाहण्याचा नयाचा दुसरा प्रकार होय, एखाद्या वस्तूकडे आपण वेगवेगळ्या पर्यायाच्या दृष्टिकोनातून पाहतो. व्यवहारात या नयाचा सतत वापर केला जातो. द्रव्यनय आणि पर्याय नयाचे सविस्तर विवेचन जैनानी केलेले दिसून येते. त्यामध्ये द्रव्यनयाचे प्रकार म्हणजे नैगम नय, संग्रह नय, व्यवहार नय, तसेच पर्याय नयाचे ही पक्रार पुढील प्रमाणे आहेत. ऋजुसुत्र नय, नयाभास वरील सर्व प्रकाराच्या माध्यमातून जैनांचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन दिसून येतो. जैन दर्शनकारांनी नयवादाच्या आधारावर आपली अनेकांतवादाची भूमिका स्पष्ट केलेली दिसून येते. एकांगी, एककल्ली दृष्टिकोनातून विचार करणाऱ्या सर्वसामान्य जणांसाठी जैनांनी अतिशय उत्कृष्ट आणि मार्मिक असे व्यवहारिक मार्गदर्शन केलेले दिसून येते. एकूणच भारतीय तत्त्वज्ञानाच्या संदर्भात आणि भारतीय आचार संहितेच्या संदर्भात आपण विचार करू गेलो तर एक गोष्ट समोर येते ती ही की, भारतीय ज्ञानसंहिता जेवढी आदर्श आहे तेवढीच भारतीय आचार संहिता तिच्या विरुध्द असलेली आपल्याला दिसून येते.

जैनांची ज्ञानमिमांसा अभ्यासात असताना त्यांच्या दुसऱ्या दृष्टिकोनाकडे आपल्याला वळवे लागते. तो दृष्टिकोन म्हणजे स्यादवाद होय स्याद् किंवा स्यात् शब्दाचे, शब्दकोशानुसार अर्थ होतो संभाव्य घ्शक्यताङ या शब्दासाठी वेगवेगळ्या भाषेतील कितीही वेगवेगळे शब्द वापरले जात असले तरी त्याचा अभिप्रेत अर्थ आहे संभाव्यता एखाद्या वस्तूविषयी एखादे अर्थ आहे संभाव्यता एखाद्या वस्तुविषयी एखादे विधान केले तर ते विशिष्ट संदर्भातच सत्य असते संदर्भ बदलला तर अगोदरच्या विधानाच्या नेमके विरूध्द असणारे विधानही तेवढेच सत्य असते, असे स्याद्वादाचे म्हणणे आहे. कोणत्याही गोष्टी बद्दल संदर्भ बदलून विधान करण्याच्या सात पध्दती आहेत. या सात पध्दती बद्दल त्यांनी सविस्तर विवेचन केले आहे. व्यवहारात हा अनुभव प्रत्यकालाच अनेक वेळा येत असतो. एखादी कृती



SHIVAJI COLLEGE HINGOLI
T.C
Lecturer
Shivaji College,Hingoli
Ta.& Dist.Hingoli (MS.)

Scanned with OKEN Scanner

SHIVAJI COLLEGE HINGOLI

एखाद्या व्यक्तीबद्दल उपकारक ठरू शकेल तिच कृती दुसऱ्या व्यक्तीबद्दल हानीकारक ठरू शकते. म्हणून जैनांचे म्हणणे आहे की वस्तू या अनंतधर्मात्मक असतात हीच बाब समजावून देण्यासाठी ते त्यांचा प्रसिध्द असा हत्तीचा दृष्टांत देतात आणि सात आंधळ्यांची कथा सांगतात. कथेमध्ये सात आंधळे ज्यांना हत्ती बघावयाचा असतो. सात जणांनी हत्तीचे सात अवयव चाचपले कुणाला हत्ती सुपासारखा तर कुणाला दोरी सारखा वाटला पण खरच हत्ती हा त्यांच्या वाटण्या सारखा होता का? नाही मुळीच नाही हत्ती हा एकसंघपणे वेगळा अवाढव्य असा एक प्राणी होता पण बघाणाऱ्या अंधळ्याना तो जसा जाणवला तो तसा त्यांनी सांगितला तात्पर्य एवढेच की, जग दिसते त्यापेक्षा फार वेगळे असते. त्याच पूर्णांशाने दर्शन एकदमात कुणाही सामान्य व्यक्तीला होत नाही. मग त्याच्याकडून जगाकडे पाहण्याचे अनेक दृष्टिकोन निसटून जातात आणि त्याला दर्शन होते ते जगाच्या एखाद्या छोट्याशा भागाचे पण म्हणून तो भाग जगाचा नाही असे नाही. पण फक्त तेवढा भाग म्हणजे जग असेही नाही. म्हणून आपण जगाकडे अनेक दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे जागा विषयीचे या विश्वाविषयीचे ज्ञान अंनतस्वरूप आहे अनेकांत आहे असे जैन दर्शनकारांचे म्हणणे आहे. एखादया विशिष्ट वस्तूविषयी एखादे विधान केले तर ते विशिष्ट संदर्भातच सत्य असते संदर्भ बदलला तर अगोदरच्या विधानाच्या नेमके विरुध्द असणारे विधानही तेवढेच सत्य असते, असे स्यादवाद सांगतो. म्हणून कोणत्याही गोष्टीबद्दल संदर्भ बदलून विधान करण्याच्या जैनानी सात पध्दती सांगितल्या आहेत. या सात पध्दती म्हणजेच स्यादवाद होय.

एखाद्या वस्तूचे अस्तित्व आहे हे सांगण्यासाठी त्या शब्दाच्या अगोदर स्याद अस्तिच असे सांगितल्या जाते. या उलट एखादी वस्तू अस्तित्वात नाही हे सांगण्यासाठी त्या शब्दाच्या अगोदर नास्ति हा शब्द लावला जातो त्यालाच घ्स्याद नास्तियङ असे म्हटले जाते. स्याद्नास्ति म्हणजे त्या वस्तूचे अस्तित्वातही नाही. त्या पुढील प्रकार म्हणजे घ्स्यादआस्तिच नास्तिचङत्या वस्तूच्या अस्तित्व किंवा नास्तित्वाविषयी, एकाच ओळीमध्ये सांगितले जाते. त्या नंतरचा प्रकार म्हणजे घ्स्याद- अव्यक्तल्यमङ म्हणजेच वस्तूचे रूप अव्ययल रूपात असते. त्या नंतरचा प्रकार म्हणजे स्याद अस्ति अव्यक्तव्य म्हणजे कदाचित प्रकार म्हणजे स्याद अस्ति अव्यक्तव्य म्हणजे कदाचित वस्तूचे अस्तित्व अव्यक्त स्वरूपात आहे. आणि शेवटचा प्रकार म्हणजे स्याद नास्ता अव्यक्लव्य म्हणजे कदाचित त्या वस्तूचे नास्तित्व अव्यक्त स्वरूपात आहे. आणि शेवटचा प्रकार म्हणजे स्यादआस्तिच-नास्तिच अव्यक्तव्य कदाचित वस्तूचे अस्तित्व आहे ही आणि नाही ही. अशा प्रकारे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून जैनांनी या विश्वाच्या अस्तित्वा विषयीचे पुरावे देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे मला हा जैनांचा ज्ञानसिध्दांत अगदी परिपूर्ण वाटतो. पण तरी ही अनेक टीकारांनी त्यावर टीका केल्याचे दिसून येते. काही टीकाकार असे म्हणतात की जैनांच्या स्यादवादामुळे सर्व मानवी ज्ञान हे संशयग्रस्त होते. अशाच अर्थाच्या अनेक टीका केल्या गेल्याचे दिसून येत.

निष्कर्ष :-

असे असले तरी जैन दर्शनकार आपल्या ज्ञानमिमांसेमध्ये अनेकांतवाद सांगतात. नयवाद आणि स्यादवाद ही अनेकांतवादाचीच रूपे आहेत. हे दोन्हीही सिध्दांत मिळून त्यांचा अनेकांतवाद बनतो. जैनांच्या मते वस्तू अनंतधर्मात्मक असते. म्हणजे वेगवेगळे दृष्टिकोन असतात त्या प्रमाणे आपण विश्वा संबंधी ज्ञान मिळविण्याच्या प्रयत्न केला पाहिजे.

## संदर्भ सूची :-


१) कोसंबी धर्मानंद, बौध्द संघाचा परिचय, मुंबई १९२६

२) डॉ.डोणगावकर वेदप्रकाश, भारतीय तत्त्वज्ञान मैत्री प्रकाशन लातूर - २०२०


Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq. & Dist. Hingoli (M.S.)



Scanned with OKEN Scanner